प्रेस नोट दिनांक ०४/०६/२०१९

## मुंबई येथील हॉटेल व्यवसायीक याचा खून करून पुणे येथे पळून आलेल्या आरोपीस १२ तासाच्या आत युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमने केले जेरबंद

दि. ४/६/२०१९ रोजी पहाटे ०१/३० ते ०२/०० वा चे सुमारास यातील मयत हॉटेल व्यवसायीक भागीदार नामे आनंद नारायण रा ॲन्टॉप हिल मुंबई याचा खुन झाला होता. सदर बाबत ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा रजि नं १८१/२०१९ भादविक ३०२ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील आरोपी हा पुण्यातील शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या मागील बाजुस आलेबाबत पो.ना. तुषार खडके व पो.हवा. रिजवान जिनेडी यांना बातमी मिळाली होती. सदरची बातमी त्यांनी वरिष्ठांना कळविली व त्यांचे मार्गदर्शन तसेच सुचनांप्रमाणे युनिट १ च्या टिमने बातमी प्रमाणे खात्री करता बातमीमधील वर्णनाचा आरोपी मिळून आलेने त्यास ताब्यात घेतले.

त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव व पत्ता सारंग हरिष पाथरकर वय ३४ वर्ष, धंदा हॉटेल चालविने, रा सामना परिवार सोसायटी, फ्लॅट नं ७०२,गोरेगाव ईस्ट, दादासाहेब फाळके चित्रनगरी जवळ मुंबई व साई हाईटस, फ्लॅट नं ०१, हिंगणे खुर्द, पुणे असे असल्याचे सांगितले. त्यास सदर ठिकाणी येण्याचे कारण विचारता त्याने उडवाउडवीची उत्तरे देवू लागल्याने व त्याचेवर संशय आलेने त्याचेकडे कसून विचारपुस करता त्याने, त्याचा हॉटेल व्यवसायीक भागीदार नामे आनंद नारायण रा. ॲन्टॉप हिल मुंबई याचा खुन करून पुणे येथे पळून आलेचे सांगितले. त्यास खून करण्याचे कारण विचारता, त्याने त्यांचे व्यवसायात देणेघेणेचे वाद होते असे सांगितले. आम्ही ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे मुंबई येथे संपर्क साधला असता सदर खुनाबाबत वरील प्रमाणे नमुद इसमाचे विरुध्द गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाली. सदरच्या आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कारवाई कामी ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे मुंबई यांचेकडील अधिकारी व त्यांचे टिमचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. संभाजी कदम, पोलीस उप-आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो.ना. तुषार खडके, पो.हवा. रिजवान जिनेडी, स.पो.फौज. बाबा चव्हाण, विजेसिंग वसावे, पो.हवा. अनिल घाडगे, अजय थोरात, प्रकाश लोखंडे, योगेश जगताप, बशीर सय्यद, श्रीकांत वाघवले, सुभाष पिंगळे, वैभव स्वामी, सुधाकर माने, सचिन जाधव, उमेश काटे, गजानन सोनुने, तुषार माळवदकर यांनी केली आहे.